महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय पुणे (गृहशाखा)

एविंग, दुसरा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, ससुन हॉस्पीटल समोर, पुणे- ४११ ००१

ईमेल.homebranchpune@gmail.com

वाचले:-

१) पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी त्यांचेकडील क्र. जि.वा. शाखा/पुणे ग्रामीण/वाहतुक वळविणेबाबत/१५/२०२६ दि.१३/०१/२०२६ रोजीचे पत्र.

२) मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११५ मधील तरतूद.

३) शासन गृह विभाग यांचेकडील अधिसूचना क्र.एम.व्ही.ए.०५८९/सीआर-१०६०/टीआर-२, दि.१९/०५/१९९०.

---

क्र. मगक/कावि/ १६ /२०२६ — दिनांक - १६/०१/२०२६.

जिल्हादंडाधिकारी सत्यमेव जयते पुणे

**विषय :- "पुणे ग्रँड चॅलेंज टूर२०२६" सायकल स्पर्धा स्टेज २ अंतर्गत रस्त्यांवरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणेबाबत.**

## अधिसूचना

**ज्याअर्थी,** वाचले क्र.१ अन्वये पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी पुणे ग्रँड चॅलेज टूर २०२६ चे अनुषंगाने वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणेबाबत विनंती केली आहे. पुणे जिल्हा प्रशासन यांच्या विद्यमाने व सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने **"पुणे ग्रँड चॅलेंज टूर२०२६"** हि सायकल स्पर्धा दि.२१ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. स्टेज -२ मधील सासवड, राजगड, वेल्हे व हवेली पोलीस स्टेशन हद्दीत एकूण ९०.२५ कि.मी अंतर असून सदर स्पर्धा दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडु नये याकरीता वाहतुक वळविणे अत्यंत गरजेचे असलेने संबधीत स्टेज २ साठी खालील प्रमाणे वाहतुक वळविणेत येत आहे.

**त्याअर्थी मी, जितेंद्र डूडी, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पुणे मला मोटार वाहन कायदा-१९८८ चे कलम ११५ मधील तरतुदीनुसार व शासन गृह विभागाचे दि.१९/०५/१९९० चे अधिसूचनेनुसार मला प्राप्त अधिकाराने होणाऱ्या पुणे ग्रँड चॅलेंज टूर सायकल स्पर्धा २०२६ चे अनुषंगाने** स्टेज २ साठी खालील प्रमाणे वाहतुक वळविण्याचे आदेश देत आहे.

- सासवड पोलीस स्टेशन:-
  सासवड पोलीस स्टेशन हद्दीतील स्टेज-२ बोपदेव माची हॉटेल बोपदेव घाट माथ ऑस्करवाडी भिवरी बोपगाव चांवळी -कोडीत युत-कोडीत बु-नारायणपुर-चिव्हेवाडी-देवडी केतकावळे असा आहे असून खालील प्रमाणे वाहतुक वळविणेत येत आहे.

१) सासवड कोंढवा रोड:- सासवड बाजुकडून कोंढवा बाजुकडे जाणारी वाहतुक पुर्णपणे बंद करुन सदरची वाहतुक सासवडसासवड बोरावके मळा-बायपास-पवार वाडी-दिवेघाट मार्गे मंतरवाडी अशी वळविणेत येत आहे. (कोंढवा बाजुकडून बोपदेव घाट मार्गे येणारी वाहतुक पुर्णपणे बंद करणेत येत आहे.)

२) सासवड ते कापुरहोळ रोड- सासवड कापूरहोळ मार्गावरील सासवड कडून कापूरहोळ कडे जाणारी वाहतुक पुर्णपणे बंद करुन सदरची वाहतुक सासवड वीर फाटा मार्गे परिंचे-वीर-तोंडल सारोळा कापूरहोळ अशी वळविण्यात येत आहे.

३) कापूरहोळ कडून चिव्हेवाडी घाट मार्गे सासवड कडे जाणारी संपूर्ण वाहतुक पुर्णपणे बंद करण्यात येत आहे.

४) राजगड पोलीस ठाणे हद्दीतून खेड शिवापूर मार्ग मरिआई घाट मार्गे सासवड कडे जाणारी वाहतुक पुर्णपणे बंद करण्यात यावी.

५) राजगड पोलीस ठाणे हद्दीतून गोगलवाडी मार्गे चतुर्मुख घाट आणि पठारवाडी घाट मार्गे भिवरी किंवा वारवडी मार्गे सावड कडे येणारी वाहतुक पुर्णपणे बंद करण्यात येत आहे.

६) ऑस्करवाडी -भिवरी-बोपगाव चांबळी कोडीत नारायणपूर चिव्हेवाडी घाट मार्गे केतकावळे कापुरहोळ मार्गावरील वाहतुक पूर्णपणे बंद करणेत येत आहे.

- राजगड पोलीस स्टेशनः- सदर स्पर्धे दरम्यान राजगड पोलीस स्टेशन हद्दीतून खालील प्रमाणे वाहतुक वळविणेत /बंद करणेत येत आहे.

१) कापूरहोळ-सावड बाजुकडे जाणारी वाहतुक पर्यायी मार्ग नसल्याने स्पर्धा कापूरहोळ पास होईपर्यंत पुर्णपणे बंद करण्यात येत आहे.

२) कापूरहोळ बाजुकडून भोर बाजूकडे जाणारी वाहतुक खालील पर्यायी मार्गाने वळविण्यात येत आहे. **पर्यायी मार्गः**-पुणे सातारा महामार्गाने सारोळा-शिंदेवाडी ता खंडाळा जि सातारा-भोर याप्रमाणे वळविण्यात येत आहे. तसेच भोर बाजूकडून कापूरहोळ बाजूकडे येणारी वाहतुक भोर-शिंदेवाडी ता खंडाळा जि सातारा या मार्गे पुणे सातारा महामार्गावर वळविणेत येत आहे.

३) कासूर्डी मु.मा हातवे डिघर बाजूकडे जाणारी वाहतुक तसेच दिडघर हातवे बु कासूर्डी मु.मा बाजूकडे येणारी वाहतुक पर्यायी मार्ग नसल्याने स्पर्धा दिडघर फाटा पास होईपर्यंत वाहतुक पूर्णपणे बंद करण्यात येत आहे.

४) नसरापूर बाजूकडून वेल्हा बाजूकडे जाणारी वाहतुक पर्यायी मार्ग नसल्याने वाहतुक पूर्णपणे बंद करण्यात येत आहे.

५) शिवापूर ते कुसगाव जाणारी वाहतुक पर्यायी मार्ग नसल्याने स्पर्धा शिवापूर पास होईपर्यंत वाहतुक पुर्णपणे बंद करणेत येत आहे.

६) कोंढणपूर फाटा ते आवसरवाडी जाणारी वाहतुक पर्यायी मार्ग नसल्याने स्पर्धा कल्याण फाटा पास होईपर्यंत सदची वाहतुक पुर्णपणे बंद करण्यात येत आहे.

- वेल्हे पोलीस स्टेशनः- सदर स्पर्धा दरम्यान वेल्हे पोलीस स्टेशन हद्दीतून खलील प्रमाणे वाहतुक वळविणेत/बंद करणेत आवश्यक आहे.

१) वेल्हे पोलीस स्टेशन हद्दीतील असणारा मार्ग व वेल्हे तालुक्यामध्ये येणारा एकमेव मार्ग हा वेल्हे-नसरापूर मुख्य रस्ता असल्याने पर्यायी वाहतुकीची व्यवस्था करण्याकरीता पर्यायी मार्ग उपलब्ध नाही.

२) सदर स्पर्धा दिवशी पुणे कडे जाणारी वाहने पाबे घाट मार्गे खनापूर मार्गे -पानशेत कुरण बु मार्गे उत्तमनगर पुणे कडे जातील.

३) नसरापुर कडे जाणारी वाहने करंजावणे जंक्शन पासून २०० मीटर वर वाहतुक पुर्णपणे बंद करण्यात यावी.

४) कुंरगवडी (राजगड पो.स्टेशन) कडून बोरावळे मार्गे कुसगाव खिंडीतुन पुणे कडे जाणारी वाहने बोरावळे फाट्यावरील टी जंक्शन जवळ २०० मीटर वर बंद करुन सदर स्पर्धा संपल्यानंतरच दोन्ही ठिकाणीची वाहतुक चालु करण्यात येईल.

- **हवेली पोलीस स्टशेनः**- सदर स्पर्धा दरम्यान हवेली पोलीस स्टेशन हद्दीतून खालीलप्रमाणे वाहतुक वळविणे/बंद करणे आवश्यक आहे.

१) मौजे डोणजे गो-हे बु खानापूर तसेच पानशेत पर्यंत मार्गावरील गावे पुणे शहरात येण्याकरीता पानशेत-कुरण-जांभळी-कातवडी-सांगरुन-माडवी बु. आगळंबे, कुडजे,उत्तमनगर, वारजे पुणे मार्गाचा वापर करुन पुणे शहरात जातील.

२) सिंहगड किल्ल्यावर पर्यटनाकरीता येणारी नागरिक यांचेकरीता पर्यायी मार्ग नसल्याने सिंहगड किल्यावर जाणारी पार्यटकांची वाहतुक सायकल स्पर्धा संपेपर्यंत पुर्णपणे बंद ठेवण्यात येत आहे.

३) मौजे डोणजे, गोळेवाडी, अतकरवाडी बाजुकडून सिंहगड घाटमार्गने खेड शिवापूर बाजुकडे जाणारी वाहतुक सायकल स्पर्धा संपेपर्यंत पुर्णपणे बंद करण्यात यावी.

स्टेज २ करीत "**पुणे ग्रँड चॅलेंज टूर२०२६** अनुषंगाने कोणताही अनुचित प्रकार घडू नये या करीता दि.२१/०१/२०२६ रोजी सकाळी ०८/०० वा ते सायंकाळी १८/०० वा वरील प्रमाणे सर्व प्रकारची वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणेत व वाहतुक बंद करणेचा आदेश देणेत येत आहे.

**सदरची अधिसूचना आज दि. १६/०१/२०२६ रोजी माझे सही शिक्क्यानिशी दिली असे.**

(जितेंद्र डूडी)
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हादंडाधिकारी, पुणे**

**प्रति,**

**पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण,** चव्हाणनगर, पाषाण रोड, पुणे

२/- प्रस्तुत आदेशानुसार वाहतुक वळविल्याचे फलक बसविण्याचे कार्यवाहीसाठी रवाना तसेच जे रस्ते पुर्णपणे बंद केले आहेत त्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षत घ्यावी.

प्रत -
१. मा. अवर सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
३. मा. प्रधान सचिव, परिवहन, महाराष्ट्र राज्य , मंत्रालय, मुंबई
४. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मंत्रालय, मुंबई
६. प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे.
७. विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, स्वारगेट, पुणे.
८. जिल्हा माहिती अधिकारी, पुणे.